# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

---

जा.क्र.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./ ꜰ/313 /२०२१. दिनांक: 13/7/21

**परिपत्रक :**

**विषय:** सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना देण्यात येणाऱ्या सवलतींमध्ये वाढ तसेच विद्युत कंत्राटदार नोंदणी शुल्कात सुधारणा करणेबाबत.....

**संदर्भ:**१)सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९/२०१४/प्र.क्र.३२२/इमारती-२ दि.१२/०९/२०१८

२)उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२), मुं.इ.दु. व पु. मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी क्र.२८, दिनांक.०९.०४.२०२१

३)मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांची कार्यालयीन टिप्पणी क्र.०४५, दि.१६/०६/२०२१

४)या कार्यालयाची कार्यालयीन टिप्पणी क्र.३८, दि.०२/०७/२०२१ वर मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा यांनी दिलेली मान्यता.

विषयांकित बाबीकरीता संदर्भीय क्र.३ अन्वये मुख्य अभियंता-२/प्रा यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

शासनाने दि.१२/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार विदयुत अभियंत्यांना देण्यात येणाऱ्या सवलती मध्ये वाढ तसेच विदयुत कंत्राटदार नोंदणी शुल्कात सुधारणा केलेली आहे. तसेच शासन निर्णयामधील मुद्दा क्र.१.६ व मुद्दा २ मधील तक्त्यात जे सुशिक्षित बेरोजगार विदयुत अभियंता ब-१ मध्ये नियमित कंत्राटदार म्हणून नोंदणीकृत आहेत अशा सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची नोंदणी वर्ग-ब प्रमाणे रु.२५ लक्ष पर्यंत करण्यात यावी असे नमूद आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदी म्हाडाच्या अखत्यारीतील सर्व मंडळाना जशाच्या तश्या लागू करण्यासाठी मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी दिनांक ०९/०७/२०२१ रोजी मंजूरी प्रदान केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासनाचे दि.१२/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयात नमूद सर्व तरतुदी हे परिपत्रक निर्गामित झाल्याच्या दिनांकापासून म्हाडाच्या अखत्यारीतील सर्व मंडळांना लागू राहतील.

Shinde 12/7/21

मुख्य अभियंता-१
प्राधिकरण

मा.उपाध्यक्ष/प्रा यांच्या मान्यतेने

**प्रति:-**

- मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण.
- मुख्य अभियंता-१,२,३/प्राधिकरण.
- वित्त नियंत्रण/प्राधिकरण.
- सचिव/प्राधिकरण.
- मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे स्वियसहाय्यक.
- मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ/पुणे/औरंगाबाद/नाशिक/नागपूर/कोंकण/अमरावती मंडळ.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण.

**माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

- उपमुख्य अभियंता - दक्षता व गुण नियंत्रण कक्ष / प्रा., पी.एम.ए.वाय कक्ष/प्रा., पी.पी.डी./मुं.मं., पश्चिम/मुं.मं., पुर्व/मुं.मं., मुं.झो.सु. मंडळ, कोंकण मंडळ, पुणे मंडळ, नाशिक मंडळ, औरंगाबाद मंडळ, अमरावती मंडळ, नागपूर मंडळ यांना आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांना परिपत्रकाची प्रत अग्रेषित करण्यासाठी
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता-१/२/३/विद्युत/प्राधिकरण.
- मुख्य लेखापरिक्षक / म्हाडा.
- मुख्य लेखाधिकारी - मुंबई मंडळ/मुं.ई.दु. व पु. मंडळ / मुं.झो.सु. मंडळ / कोंकण मंडळ / पुणे मंडळ / नाशिक मंडळ / औरंगाबाद मंडळ / अमरावती मंडळ / नागपूर मंडळ.

सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना देण्यात येणा-या सवलतींमध्ये वाढ तसेच विद्युत कंत्राटदार नोंदणी शुल्कात सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-०९/२०१४/प्र.क्र.३२२/इमारती-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १२/०९/२०१८

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र.सीएटी १०९६/सीआर १२/इमारती-२ दिनांक २०.४.१९९८
२) शासन निर्णय क्र.सीएटी १०९७/प्र.क्र.४२/इमारती-२ दिनांक २३.०१.२००१
३) शासन निर्णय क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमारती-२ दिनांक १७.०५.२००२
४) शासन निर्णय क्र.सीएटी २००६/सीआर ४२/इमारती-२ दिनांक ११.०२.२००४
५) शासन निर्णय क्र. सीएटी ०५/२००५/ प्र.क्र.२०८/इमारती-२ दिनांक १.०९.२००५
६) शासन निर्णय क्र.सीएटी-०१/०६/प्र.क्र.१४१/इमारती-२ दिनांक ८.०२.२००७

**प्रस्तावना :-**

सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांना देण्यात येत असलेल्या सवलतीमध्ये वाढ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३१/०५/२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे निर्गमित केला आहे. त्यानुसार सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांना आता वर्ग-४ प्रमाणे म्हणजेच रु.१५० लक्ष रकमेपर्यंतच्या कामांकरिता नोंदणी देण्यात येते. राज्यातील उच्च शिक्षित अभियंत्यांच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग शासनाच्या कामांमध्ये होऊन सा.बां. विभागातील कामे उत्तम व दर्जेदार होण्याच्या दृष्टीने शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणेच सुशिक्षित बेरोजगार अभियंता (विद्युत) यांना देण्यात येणा-या सवलतीमध्ये वाढ करण्याबाबत विविध संबंधित संघटनांमार्फत मागणी करण्यात आली आहे. सुशिक्षित बेरोजगार अभियंता (विद्युत) यांना देण्यात येणा-या सवलतींमध्ये मागील १० वर्षाच्या कालावधीत वाढ झाली नसल्याने, बाजारभावात झालेली वाढ तसेच वाढती स्पर्धा लक्षात घेता सुशिक्षित बरोजगार अभियंता (विद्युत) यांना स्पर्धेत उभे राहण्याच्या दृष्टीकोनातून देण्यात येत असलेल्या सवलतीमध्ये वाढ करण्याच निर्णय शासन घेत आहे.

तसेच दि.२७/२/२००९ रोजी शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या स्थापत्य व विद्युत कंत्राटदारांच्या समवर्गाच्या नोंदणी शुल्कात तफावत आढळून येत असल्याने विद्युत कंत्राटदाराच्या नोंदणी शुल्कात सुध्दा सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१.१ विद्युत बेरोजगार अभियंत्यांना प्रथम नोंदणी, वर्ग ब-१ (म्हणजे रु.१५ लक्ष) ऐवजी वर्ग-ब (म्हणजे रु.२५ लक्ष) पर्यंत देण्यात यावी. या पंजीकरणाची मुदत १० वर्षे राहील.

१.२ तसेच विद्युत बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्या कोटयातील रु.३० लक्ष रकमेची कामे देण्यात येत होती. त्यात आता वाढ करुन सदरील मर्यादा रु.५० लक्ष पर्यंत करण्यात येत आहे. तसेच त्यांना देण्यात येणा-या कामांची कमाल मर्यादा रु.७.५० लक्ष वरुन रु.१० लक्षपर्यंत करण्यात येत आहे. ज्या विद्युत बेरोजगार अभियंत्यांनी रु.७.५० लक्ष रकमेचे काम यशस्वीरित्या केले आहे त्यांना सदर सवलत उपलब्ध राहील.

१.३ याकरिता विद्युत बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्या कोटयातील रु.३ लक्ष रकमेपर्यंतची कामे विनास्पर्धा देण्यात यावी व रु. ३ लक्ष रकमेवरील कामे ई-निविदा प्रक्रीया राबवून देण्यात यावी.

१.४ ज्या विद्युत सुक्षिशित बेरोजगार अभियंत्यांना १० वर्षांच्या कालावधीत रु.५० लक्ष रकमेची कामे त्यांच्या कोटयातील देण्यात आली नसतील अशा विद्युत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची मूळ १० वर्षे पर्यंतची नोंदणी मर्यादा त्यांच्या रु.५० लक्ष रकमेचा कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील ५ वर्षापर्यंत वाढविण्यात येत आहे.

१.५ विद्युत सुक्षिशित बेरोजगार अभियंत्यांनी प्रत्येक ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतांना सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रातील “बंधपत्र” सादर करणे आवश्यक आहे.

१.६ ज्या अभियंत्याची मूळ नोंदणी विद्युत सुशिक्षित बेरोजगार अभियंता श्रेणीत होती व तद्‌नंतर जे त्यांच्या पात्रतेनुसार वर्ग ब-१ पेक्षा खालील वर्गात नियिमित कंत्राटदार म्हणून नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची नोंदणी वर्ग-ब प्रमाणे रु.२५ लक्ष पर्यंत करण्यात यावी.

२. दि.२७/२/२००९ रोजीच्या विद्युत कंत्राटदारांच्या विविध वर्गाच्या नोंदणी शुल्कात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटदार (विद्युत) नोंदणी वर्ग | सध्याचे नोंदणी शुल्क | विद्युत कंत्राटदारीचे सुधारित शुल्क |
|---|---|---|---|
| १ | अमर्याद (अ) | रु.२५,०००/- | रु.१०,०००/- |
| २ | रु.२५ लक्ष (ब) | रु.२०,०००/- | रु. ७,५००/- |
| ३ | रु.१५ लक्ष (ब-१) | रु.१५,०००/- | रु. ५,०००/- |
| ४ | रु.१० लक्ष (क) | रु.१०,०००/- | रु. ३,०००/- |
| ५ | रु.७.५० लक्ष (ड) | रु. ५,०००/- | रु. ३,०००/- |
| ६ | रु.२.०० लक्ष (इ) | रु. ३,०००/- | रु. २,०००/- |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९१२१५२२२४५०१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sachin Manikrao Chivate

Digitally signed by Sachin Manikrao Chivate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=e51dff58ad80dfdae3976edee46d1bf7934d01469cb4d916976c25305666b613,
serialNumber=40ae84322c80d3e4ea1b574eb3782ed6cb133b938933bdf197ed5a1551d8622a, cn=Sachin Manikrao Chivate
Date: 2018.09.12 15:24:39 +05'30'

**( सचिन चिवटे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री (सा.बां.), यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (जलसंपदा), यांचे खाजगी सचिव
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) महालेखापाल, लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) सचिव (रस्ते)/सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

९) सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी**

११) सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग
१२) मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकारण, मुंबई, महाराष्ट्र
१३) गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई
१४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१५) व्यवस्थापकीय संचालक, शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)
१६) निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१७) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ
१८) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
१९) आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतीसह)
२०) सर्व कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
२१) सर्व अधीक्षक अभियंता/सर्व कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग
२२) सर्व अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
२३) अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी
२४) संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई
२५) सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषदा
२६) सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग, मंत्रालय
२७) निवडनस्ती (इमारती-२) कार्यासन

## सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांनी/ई-निविदेत भाग घेताना प्रत्येक कामासोबत सादर करावयाचे बंधपत्र

**" बंधपत्र "**

मी,-----------------------------------------------------------------
शपथ पत्र लिहून देतो की, माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता अंतर्गत वर्ग-ब मधील नोंदणी दि. पर्यंत ग्राहय आहे. सद्य:स्थितीत मी कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/ खाजगी संस्थेत कार्यरत नाही. तसेच मी कोणतेही पुढील शिक्षण घेत नसून सदर काम मी स्वत: करणार आहे.

उपरोक्त बाबतीत असत्यता आढळून आल्यास होणा-या कार्यवाहीस मी व्यक्तिश: जबाबदार राहील. असत्यतेमुळे माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी रद्द करण्यात आल्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

सही-

नाव-